# समर्थ भारतासाठी आंतरिक सुरक्षेपुढील आह्वाने व उपाय

प्रवीण दीक्षित

# आंतरिक सुरक्षेचे निकष

- एखादे राष्ट्र हे Failed state आहे का ?
- त्या भागात राहणाऱ्या लोकांना तिथे राहणे सुरक्षित वाटते का ? लोकांचा पोलिसांवर व पोलिसांचा लोकांवर विश्वास आहे का ?
- बाहेरील लोकांना तिथे निधी गुंतवावा वाटतो का?
- विमा उद्योजकांच्या मते त्या भागातील जागांची किंमत वाढतीय का कमी होतीय?
- तिथली जनता कायदे/ नियम स्वतःहून किती पालन करते
- घटना घडल्यानंतर किती वेळात पोलिस पोचून कारवाई करतात?
- एखाद्या भागात social regulation आहे की लोक उदासीन आहेत?

# श्रीरामाने भरताला सांगितलेले निकष

- वाल्मीकीरामायणात अयोध्याकाण्डात100 व्या सर्गात श्रीराम भरताला त्याचे क्षेमकुशल  विचारण्याच्या निमित्ताने आंतरिक सुरक्षेचे निकष समजाऊन सांगतात.
- आदरणीय लोकांचा मान राखला जातो का ?
- गुप्त मंत्रणा शत्रूंना कळत नाही ना ?
- अधिक दण्ड किंवा कराने प्रजा मंत्र्यांना वैतागलेली नाही ना ?
- सैनिकांना वेळेवर योग्य मोबदला दिला जातो का ?
- राजदूत सदसद्‌विवेकबुद्‌धीयुक्त व कुशलआहेत का ?

- चोरी करताना पकडलेले,चोरी चे पुरावे असलेले, ज्याच्याकडून चोरीचा माल मिळाला आहे अशा व्यक्तींना पैशाच्या लोभाने सोडून दिले जात नाही ना ?
- न्याय मागायला आलेल्या गरीबाला पैशाचा विचार न करता  न्याय दिला जातो का ?
- निरपराध व्यक्तींना खोटे पणाने दंड दिला जात नाही ना ?
- पैशांसाठी (अर्थ) धर्माला, किंवा धर्माच्या द्वारा पैशाला हानी केली जात नाही ना ?
- आसक्ती व लोभरूपी काम (हाव) ह्या दोन्हींच्या द्वारा  धर्म व अर्थ  ह्या दोन्हींमधे बाधा तर निर्माण केली जात नाही ना ?

# राजाचे ( राज्य सुरक्षेचे) 14 दोष

- नास्तिकता, (श्रद्धा नसणे), असत्य भाषण, क्रोध, प्रमाद, दीर्घसूत्रीपणा,
- ज्ञानी लोकांशी संपर्क न ठेवणे, आळस, डोळे व इतर पाच इंद्रियांच्या अधीन राहणे
- राजकारणाच्या विषयांमधे एकट्याने विचार करणे,
- उद्देश न समजता उलट विचार करणाऱ्या मूर्खांशी  विचार विनिमय करणे
- निश्चित केलेल्या कामांना त्वरित प्रारंभ न करणे
- गुप्त मसलती सुरक्षित न ठेवता त्यांना प्रसिद्धी देणे
- मङ्ल कामांसाठी अनुष्ठान न करणे व सर्व शत्रूंवर एकदम हल्ला करणे हे 14 दोष आहेत

# आंतरिक सुरक्षेच्या आह्वानांचे स्रोत

- बाह्य ताकदींमुळे निर्माण होणारी आह्वाने
- अंतर्गत आह्वाने

# बाह्य आह्वाने

- भारत 2047 पर्यंत विकसित राष्ट्र होऊ नये ह्यासाठी अनेक राष्ट्रे कसून प्रयत्न करीत आहेत.
- त्यात भारताच्या शेजारी असणारे देश आहेत तसेच दूर असणारेही आहेत.
- भारतातील अल्पसंख्यांकांना फूस लावून त्यातील जमेल तेवढ्या व्यक्तींना मूलतत्ववादी बनवणे, भारतात बेकायदेशीर पणे घुसणे व  बेकायदेशीरपणे तिथेच राहणे व गुन्हे करणे
- लोकांना  योग्य प्रतिनिधींना निवडून न देणे व  दिलेल्या प्रतिनिधींना काम करू न देणे
- घटने विरुद्ध वातावरण निर्माण करणे ( Urban Naxals)

- भारतात शहरी नक्षलवादाचा प्रभाव वाढवणे
- विकास कामांना खीळ घालून कमीत कमी 1.5 ते 2 टक्के विकास कमी होईल ह्या साठी धडपडणे
- विविध धर्म, प्रांत, भाषा, जाती, अनुसुचित जाती विरुद्ध अन्य , स्त्री, पुरुष ह्यांच्यामधे असुविधांसाठी  प्रक्षोभ निर्माण करून लोकांनी निवडून दिलेल्या सरकार विरुद्ध अविश्वासाचे वातावरण निर्माण करणे
- न्यायालयांमध्ये अर्ज, खटले दाखल करून सरकारला जेरीस आणणे

- स्वयंसेवी संस्थाचे जाळे निर्माण करून जाहीर केलेल्या उद्देशापेक्षा वेगळी कृत्ये करणे जसे –
    - वंचित विकासाच्या नावाखाली खोटी आमिषे दाखवणे
    - उच्च शिक्षणासाठी अनुदान देतो सांगून भारतीयांची भारताविरुद्ध डोकी भडकवणे
    - आरोग्यासाठी निधि देतो सांगून फसवणूक करणे
    - धर्मांतर करणे
    - राष्ट्रीय पक्षाविरुद्ध मतदानास प्रोत्साहन देणे

# अंतर्गत आह्वाने

- दहशतवाद-
  - काश्मीर व अन्य भागात  पाकिस्तान पुरस्कृत  छ्‌द्‌म हल्ले (proxy war) करणे, सुशिक्षित तरुणांना मूलतत्ववादी बनवून हिंसाचार घडवणे
  - मणिपूर मधील म्यानमार व अन्य पुरस्कृत अन्य जातींविरुद्‌ध दंगे घडवणे
  - पंजाबमधे पाकिस्तान व अन्य देशांकडून मिळणाऱ्या मदतीने खलिस्तानच्या नावाने हल्ले करणे
- नक्षलवाद
  - छत्तीसगड, झारखंड, तेलंगाणा, ओरिसा, महाराष्ट्र ह्यांच्या सीमा भागातील सरकारी कार्यालयांवर व पोलिसांवर हल्ले, करून विकासकामे रोखून ठेवणे

# अंमली पदार्थांचा गैरव्यापार

- अफगाणिस्तान, थायलंड, नायजेरिया व अन्य भागातून अंमली पदार्थ जमिनीमार्गे, समुद्र मार्गे, हवाई मार्गे, ड्रोनच्या सहाय्याने भारतात घुसवणे, तरुणांना त्याचे व्यसन लावणे
- येथील लोकांच्या पैशाने  अवैध शस्त्रे खरीदणे
- व त्यातून दहशतवाद्यांना खतपाणी घालणे (narco terrorism)
- तरुणांमधे नैराश्य पसरवणे व त्यांना निरुपयोगी करणे

# सायबर भामटेगिरी व आर्थिक गुह्ने

- सायबर गुलामी –मानव तस्करी
- डार्क नेट व त्यातून होणारे आर्थिक गैरव्यवहार,
- बिट कॉइन मधुन आर्थिक फसवणूक
- पॉंझी योजना व फसवणूक
- पोर्नोग्राफी
- महिलां विरुद्ध गुन्हे, Digital Arrests

# वाहतुकीतील बेशिस्त

- दरवर्षी अपघातात 5 लाख लोक मरतात
- 60 टक्के 34 पेक्षा कमी वयाचे असतात
- 10 लाख लोक जायबंदी होतात
- विरुद्ध दिशेने वाहन चालवणे
- भरमसाठ लोक वाहनात भरणे
- सिग्नल न जुमानता वाहन चालवणे

# सामाजिक मंचांचा गैरवापर

- खोट्या नावाने प्रचंड संख्येने खाती उघडणे व समाजात एकमेकांबद्दल विद्वेष पसरवणे
- विशिष्ट जमातीच्या लोकांना अल्प वेळात हिंसेला पाचारण करणे
- खोटे मजकुर , चलत्चित्रे पसरवणे ज्यामुळे लोक हिसक बनतील
- अंमली पदार्थ विक्री करणे
- तरुणांना धार्मिक कट्टरवादी बनवणे, महिलांना धर्म बदलायला लावणे

# उपाय

- सकारात्मकता वाढवणे व शिस्तप्रिय  समाज घडवणे
- सतर्क राहणे, संशोधनावर भर देऊन नवीन तंत्रज्ञान आत्मसात करणे
- व्यवसाय कौशल्य विकास करणे, जागतिक स्पर्धेत स्वतःला सक्षम बनवणे
- पूर्वग्रह न ठेवता सर्वांना बरोबर घेऊन उद्दिष्ट साध्य करणे. पोलीस मित्र संकल्पना राबवणे.
- समाजातील दुर्बळ, वंचित, दिव्यांग लोकांना सुदृढ करण्यास मदत करणे
- वातावरण न बिघडवणे

- नैराश्य टाळण्यासाठी आध्यात्मिक ग्रंथांचे सामुहिक पठण, श्रवण, चिंतन, चर्चा सत्रे आयोजित करणे, कोणालाही शक्यतो एकुलते  न ठेवणे
- सांघिक खेळाच्या स्पर्धा ठेवणे
- सामाजिक कामे करणाऱ्यांचा जाहीर सत्कार करणे
- स्पर्धा परीक्षांना तरुणांना तयार करणे
- अग्निवीर , सैनिक, बालक पोलीस  म्हणून प्रोत्साहन देणे
- परदेशात जाण्यास प्रशिक्षण देऊन जगाला मार्गदर्शन करणे (Democratic advantage)

# विश्वगुरु होण्याची गुरुकिल्ली

- ह्या गोष्टींमुळे भारत विश्वगुरु व्हायला मदत होणार

- संदर्भः www.praveendixit.com